# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 04/10/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

प्रत - प्रमुख लिपीक- पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वाचक शाखा (पोअ यवतमाळ.)

## भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

# निरंक

## भाग २ - रजा

क्रमांक : पोअय/पशा-२/अर्जित रजा-मंजुर/२०१९ 11432 यवतमाळ, दिनांक :- 4 OCT 2019

**आदेश**

खालील नमुद लिपीक वर्गीय कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांनी मागणी केलेल्या कारणास्तव अर्जीत रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

त्यांचे सदर रजेचे काळात त्यांचे नावासमोर दर्शविलेले लिपीक वर्गीय कर्मचारी हे स्वत:चे पदाचा पदभार सांभाळून त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहतील.

| अ.क्र. | लिपीक वर्गीय कर्मचारी यांचे नांव/पदनाम व नेमणुक | रजा मंजुरीचे कारण | रजा कालावधी | अतिरिक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.यु.बि.राजपुत वश्रेली | बुलडाणा येंथे जाणे असल्याने | दि.७.१०.२०१९ ते दि.११.१०.२०१९ - ५ दिवस अर्जित रजा | श्री.रविंद्र नंदनवारकश्रेली |
| २ | श्री.विजय जाधव कश्रेली | धार्मिक कामा करिता | दि.५.१०.२०१९ ते दि.७.१०.२०१९ - ३ दिवस अर्जित रजा | श्री प्रकाश रेलकर कश्रेली |

( मा.पो.अ.यांचे मंजुरीने )

(पि.के.गिरोलीकर)
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

वरील नमुद सर्व लिपीक वर्गीय कर्मचारी

प्रत :- पोउपअधि.मुख्या/का.अ/डिप्रीजी लिपीक

क्रमांकः- सआलि -५/र.प्र.स./ पो.कर्म./गट वर्ष-२०१७ ते २०२०/२०१९ 11429 यवतमाळ, दिनांक

-4 OCT 2019

## आ दे श.

खालील नमुद पोलीस कर्मचारी हयांना त्यांचे मुख्यालय ते घोषित ठिकाण व परत अशी रजा प्रवास सवलत महाराष्ट्र शासन.वित्त विभाग शासन निर्णय क्र. रप्रस/१०९/१८४/सेवा-५. दिनांक २८/०५/१९९५ अन्वये गट वर्ष २०१७ ते २०२० करिता मंजुर करण्यांत येत आहे.

नमुद पोलीस कर्मचारी हयांना किरकोळ/अर्जित रजेवर सोडल्याची तारीख तसेच परत आल्याची तारीख व वेळ या कार्यालयास कळवावी

| अ क्र | कर्मचारी नाव व ब. नं. | नेमणुक पो.स्टे. | प्रवास कोठुन कोठे | कुटुंबातिल व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/२७१० यशवंत घुगे | पो.स्टे.दराटी | यवतमाळ ते चिपळुन | स्वतः पत्नी व वडील,आई. |
| २ | पोशि/२६९४ रविद्र चव्हान | पो.स्टे दराटी | यवतमाळ ते चिपळुन | स्वतः पत्नी व वडील आई.मुलगा |
| ३ | मपोशि/२४७०सोनाली हनवते | दिग्रस | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पती. |
| ४ | पोशि/२४३५ राम सोळके | पो.मुख्यालय | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः आई. |
| ५ | पोकॉ/२५५०अमीत लोखंडे | आर्णि | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पत्नी व आई वडील. |
| ६ | पोशी/२६७३दिगंबर गिते | पो.मुख्यालय | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पत्नी , आई वडील. |
| ७ | पोशी/२५२७ महेश बाडलवार | पो.स्टे.आर्णि | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पत्नी व आई वडील. |
| ८ | मपोशि/२३२१ वृशाली ढोके | यवतमाळ श | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः बहीन,बहीन |
| ९ | चापोका/२३७३ राहुल बोंडे | मारेगाव | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पत्नी ,व आई,मुलगा मुलगी |
| १० | पोशि/२६६८ अमर भवरे | पो.मुख्यालय | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पत्नी व आई,मुलगा. |
| ११ | मपोना/२०८७रूपाली बदखल | वणी | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पती व सासु ,सासरे मुलगा ,मुलगी |
| १२ | पोकॉ/२६४८अविनाश खाडे | वणी | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः आई,वडील. |
| १३ | मनापोशी /निशा शेंडे | यवतमाळ श | यवतमाळ ते सिंधदुर्ग | स्वतः आई. |
| १४ | मनापोशी/२१३४ वर्षा पुंड | यवतमाळ श | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पतीव सासु,सासरे मुलगी. |
| १५ | पोना/२०३७ अशोक राठोड | .आर्णि | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पत्नी व आई,मुलगी,मुलगी. |
| १६ | मपोना/२१०१ शितल उजवे | नियंत्रण कक्ष | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पती व आई,वडील |
| १७ | मपोना/२१३५दिपाली माकोडे | -----//---- | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पती व आई वडील |
| १८ | मपोना/२१०७ सीमा रोकडे | अवधुतवाडी | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पती व आई,वडील मुलगा. |
| १९ | नापोका/२२१९ दिलीप जाधव | वणी | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वतः पत्नी व आई,वडील,मुलगा,मुलगी |
| २० | मपो शि/२६७६ ज्योती मुंडे | पो.मुख्यालय | यवतमाळ ते सावंतवाडी | स्वतः पती व सासु, सासरे |
| २१ | नापोकॉ/२२३९ राजु तिजारे | उपविपोअ उमरखेड | यवतमाळ ते गणापती पुळे | स्वतः पत्नी व आई,वडील मुलगा,मुलगी. |
| २२ | पोकॉ/२३४३ नितीन खवडे | उमरखेड | यवतमाळ ते गणापती पुळे | स्वतः आई वडील. |
| २३ | पोकॉ/२५२०मारोती मदने | दिग्रस | यवतमाळ तगणपतीपुळे | स्वतः आई,वडील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | पोशी/२६१४ विजय नागरे | अवधुतवाळी | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वत: पत्नी व मुलगा,वडील |
| २५ | नापोशी/२१५० सतिश शिंदे | वसंतनगर पुसद | यवतमाळ ते अंबेजोगाई | स्वत: पत्नी व आई मुलगा,मुलगी. |
| २६ | चापोना/२२०३ नामदेव बोरकर | वाहतुक शाखा | यवतमाळ ते गणपतीपुळे | स्वत: पत्नी व वडील मुलगी. |
| २७ | मपोशी/२७०० राधा जाधव | उमरखेड | यवतमाळ ते अंबोली | स्वत: वडील आई, |
| २८ | मपोशी/२५९०,सुषमा मेश्राम | पो.मुख्यालय | उमरखेड ते गणपतीपुळे | स्वत: पती,आई,वडील. |

**(अनिलसिंह गौतम)**
**पोलीस उपअधीक्षक (मुख्या)**
**यवतमाळ**

प्रति,

संबंधीत सर्व कर्मचारी

मार्फत :- पो.नि.नियंत्रण कक्ष/जि.वि.शा. शाखा /यवतमाळ शहर/वणी/मारेगाव/दिग्रस/उमरखेड/आर्णि/दराटी/अवधुतवाळी/वाहतुक शा/वसंतनगर पुसद/ पो. मुख्यालय, यवतमाळ /यांना आवश्यक त्या कार्यवाहीस.

प्रत :- डिपीजी लिपीक / प्रवास भत्ता लिपीक.

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक: पोअय/सआली-२/३००दिवस/अ.रजा रोखी/२०१९, 11437 यवतमाळ दिनांक :- 4 OCT 2019

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम ,१९८१ नियम६८ मधिल तरतुदी नुसार वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक अर्जीत रजा २४०१/सेवा-९,दिनांक १५.०१.२००१ अन्वये , खालील नमुद पोलीस कर्मचारी त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सेवानिवृत्ती दिनांकास त्यांच्या रजेखातीत रजालेखामध्ये शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.कर्म/नाव व पदनाम | से. नि. दिनांक | सेवटचे वेतन | शिल्लक रजा | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/७७७ , विलास कुमरे | २८.०२.२०१९ | ४५४००/- | ३०० | जि.वि. शाखा , पांढरकवडा |
| २ | मयत, चापोहवा/७९०, राजु चव्हाण | १२.०९.२०१९ (मयत ) | ४११००/- | ३०० | पोनि. मोपवि |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

वेतन लिपी क लेखा शाखा (दोन प्रतित )/ पेन्सन लिपीक लेखा शाखा/डिपीजि लिपीक आस्थापना शाखा यांना माहितीस व कार्यवाहिस

**प्रत,**

जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.

# भाग ४ - बक्षिस / मानधन

## निरंक

क्रमांक :पोअय/डीपी/३१-बी/अ.आ/तामील प्रत /माजी पोशि- नादरे / 11440 /२०१९ यवतमाळ, दि. 4 OCT 2019

**संदर्भ :-** मा. राज्यमंत्री गृह (ग्रा.)यांचे पत्र क्र.पीडीई १०१६/प्र.क्र.१६/पोल-६ अ दि.१३/०९/२०१९

**विषय :-** **अपील अर्ज निर्णय तामील करणेबाबत.**
**माजी पोलीस शिपाई, श्री प्रदिप रामजी नादरे** ब.नं. 588

०००

संदर्भांकित विषयान्वये प्राप्त फेरअपील अर्ज निर्णयाच्या दोन (०२) प्रती आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपण एक (०१) प्रत माजी पोलीस शिपाई, श्री प्रदिप रामजी नादरे देवुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(अनिलसिंह गौतम)
प्र. पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

**प्रति,**

माजी पोलीस शिपाई, श्री प्रदिप रामजी नादरे

**मार्फतः- ठाणेदार पो.स्टे. पुसद शहर**

प्रत :- आस्थापना लिपीक कर्मचारी /वेतन लिपीक -१/ डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य

**मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**

**क्रमांक -: पीडीई १०१६/प्र.क्र.१६/पोल-६अ**

श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ .....वादी

**विरुध्द**

पोलीस अधीक्षक, यवतमाळ ...... प्रतिवादी

**मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम, १९५६ मधील तरतूदी अन्वये दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जावर सुनावणी**

वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ यांनी केलेल्या कसुरीमुळे शिस्तभंग प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांना दिनांक ०२/०५/२००५ च्या आदेशान्वये **"सेवेतून काढून टाकणे"** ही शिक्षा दिली. सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द वादी यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे केलेले अपील तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे केलेले फेरअपिल अनुक्रमे दिनांक ०२/०७/२०१२ व दिनांक २४/०१/२०१३ च्या आदेशान्वये फेटाळण्यात आले. या आदेशाविरुध्द वादी श्री. नादरे यांनी शासनाकडे दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जावर दिनांक ०८ऑगस्ट, २०१९ रोजी माझ्यासमोर सुनावणी झाली. सदर सुनावणीस वादी श्री. प्रदीप रामजी नादरे तसेच गृह विभाग, मंत्रालय येथील व क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**वादी यांच्यावरील दोषारोप** :आपण पोलीस स्टेशन पुसद शहर येथे नेमणुकीस असताना कोणतीही सुचना न देता तुम्ही दिनांक २२/०३/२००३ पासुन ते दिनांक ०३/०८/२००३ पर्यंत एकूण १३५ दिवस अनधिकृतपणे कर्तव्यावरुन सतत गैरहजर होते.

दिनांक ०६/०८/२००३ रोजी सकाळी १०.३० वा .पोलीस स्टेशन ,पुसद शहर येथून उजळणी प्रशिक्षणाकरीता पोलीस मुख्यालय ,यवतमाळ येथे हजर होण्यासाठी रवाना करण्यात आले होते. प्रशिक्षणास हजर न होता तसेच पोलीस स्टेशन पुसद शहर किंवा पोलीस मुख्यालय ,यवतमाळ येथे कोणतीही सूचना न देता अनाधिकृतपणे दि. २८/०३/२००४ चे ११.०० वा. पर्यंत एकूण २३५ दिवस सतत कर्तव्यावरुन गैरहजर होते.

तुम्ही कर्तव्यावरुन वांरवार अनधिकृतपणे दिर्घकाळ गैरहजर राहण्याची सवय असून त्याबदल त्यांना विविध सौम्य शिक्षा देवून त्यांचा गैरहजेरीचा कालावधी रजा मंजुर करुन विनियमित करण्यात आला. आपल्या विनंतीवरुन आपली पोलीस स्टेशन पुसद शहर येथून पोलीस स्टेशन दराटी अशी बदली आदेशित करण्यात आली आहे . त्यानुसार त्यांना पो.स्टे. पुसद शहर येथून दि.२८/०३/२००४ चे ११.००वा. पो.स्टे. दराटी येथे बदली पास देवून बदलीवर सोडण्यात आले परंतु तुम्ही अद्याप पर्यंत तेथे रुजू झालेले नाहीत.

तुम्हास तुमच्या गैरहजेरीबाबत खुलासा देण्याबाबत दि. १५/०५/२००४ ला पो.स्टे. पुसद शहर येथे हजर राहण्याबाबत नोटीस बजावली असता तुम्ही पोनि. हयांच्या समक्ष हजर झाले नाही किंवा अनुपस्थितीबाबत लेखी सुचना दिली नाही. यावरुन तुमची वागणुक बेशिस्त व नियमबाहय तसेच पोलीस खात्यास न शोभणारी दिसून येते.

**वादी यांचे म्हणणे** : महोदय, मी दिनांक २२/०३/२००३ पासुन ते दिनांक ०३/०८/२००३ पर्यंत गैरहजरीच्या कालावधीत खाजगी डॉ. एम. आर. मेघावत यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी अर्जासोबत जोडुन सादर केले होते. त्या काळात मी आजारी होतो. त्यानंतर माझा गैरहजेरीचा कालावधी रजा

मंजुर करुन विनियमित करण्यात आला आहे. माझ्या नोकरीच्या काळात माझे भावाचे व वडीलांचे निधन झाल्याने मी पोलीस स्टेशन दराटी येथे रुजू झालो नाही. माझे कुटूंबासह दोन्ही भावाचे कुटूंब माझेवर अवलंबून होते. एकामागून एक कोसळणा-या आपत्तीमुळे माझ्या कुटूंबाची आर्थिक ओढाताण होऊ लागली. कौंटूबिक परिस्थितीमुळे मला मानसिक नैराश्य आले. महोदय माझी एकुण १२ वर्षे सेवा झाली असून मला नोकरीशिवाय पोट भरण्याचे कोणतेही साधन नाही. तरी महोदयांनी माझ्या दयनीय आणि बिकट परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन मला पुन्हा सेवेत घेण्यात यावे, ही नम्र विनंती.

**प्रतिवादी यांचे म्हणणे:-** वादी यांना देण्यात आलेली शिक्षा कसुरीच्या मानाने योग्य असून त्याचा पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात यावा.

**निष्कर्ष :** वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई तसेच उपस्थित अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच वादी व प्रतिवादी यांनी सादर केलेली व इतर उपलब्ध कागदपत्रे तपासण्यात आली. श्री. नादरे यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत वरीष्ठांना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याचे दिसून येत आहे. वादी यांच्या घरातील भाऊ व वडील यांचे मृत्यू झाल्याचे मृत्यू दाखल्यावरून दिसून येत आहे. वादी यांची कौटुंबिक परिस्थिती व शासनाचे कसुरदारास टप्याटप्याने शिक्षा देण्याचे धोरण लक्षात घेता सदर पुनर्विलोकन अर्जावर मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ यांचा पुनर्विलोकन अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ यांना देण्यात आलेली **"सेवेतून काढून टाकणे"** ही शिक्षा रद्द करुन त्यांना सेवेत पुन:स्थापित करुन त्याऐवजी **"देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षे रोखणे (परिणामाशिवाय)"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

३. वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ यांना शासन सेवेत पुन:स्थापित करताना ते भविष्यात गैरहजर राहणार नाहीत याबाबतचे हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे.

४. वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ सेवेत रुजू झाल्यानंतर एक वर्षापर्यंत त्यांच्या गैरहजेरीचे निरीक्षण ठेवून पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्याबाबतचा दरमहा अहवाल प्रमाणित करावा.

५. वरीलप्रमाणे ३) व ४) प्रमाणे कसुरी आढळून आल्यास पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी वादी श्री. नादरे यांचेविरुध्द नियमानुसार योग्य ती करवाई करावी.

६. वादी श्री. प्रदीप रामजी नादरे, माजी पोलीस शिपाई, यवतमाळ यांना शासन सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष कामावर रुजू होण्याच्या कालावधीतील सेवाबाहय कालावधी हा सेवानिवृत्ती वेतनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही लाभासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नये.

७. वरील निर्णयाप्रमाणे संबंधितानी आवश्यक ती कार्यवाही करावी.

दिनांक :- ०८/०८/२०१९

ठिकाण :- मुंबई

(दिपक केसरकर)
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण)

सत्य प्रत

कार्यासन अधिकारी
गृह विभाग, मंत्रालय

क्रमांक:पोअय/डीपी/३१-बी/ पोहवा -१६११ पिसे /निलंबन/११४५७/२०१९ यवतमाळ दिनांक ०४/१०/२०१९

11457 4 OCT 2019

## निलंबन आदेश

**अपचारी :-** पोहवा -१६११ गजानन भाऊराव पिसे नेमणुक पोलीस स्टेशन,यवतमाळ शहर

आपण पोहवा -१६११ गजानन भाऊराव पिसे पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे नेमणुकीस असुन तक्रारदार विशाल दिपक राऊत, रा.यवतमाळ हे त्यांचे कुटुंबावर कलम ४९८ भादवि दाखल गुन्हयामध्ये तक्रारदार व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना सहकार्य (मदत) अटक न करण्यासाठी व तपासात सहकार्य करण्यासाठी आपण स्पष्टपणे रुपये ५०००/- ( रुपये पाच हजार ) लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले आहे. यावरुन आपणावर पो.स्टे.यवतमाळ शहर येथे अप क्र.०५८२, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये दि.०४/१०/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही बाब अतिशय गंभिर असुन अशा आपल्या कर्तव्यातील वर्तनामुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलिन होण्यास आपण कारणीभुत ठरले आहात. आपल्या गैरवर्तणुकीबाबत मला प्राप्त अधिकारान्वये चौकशीचे अधिन आदेश दिनांकापासुन तात्काळ निलंबित करण्यात येत आहे.

२. निलंबन काळात आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण पोलीस उपअधिक्षक मुख्यालय यवतमाळ हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**( एम.राज कुमार )**
**पोलीस अधिक्षक,यवतमाळ**

प्रति,

पोहवा /१६११ गजानन भाऊराव पिसे नेमणुक पोलीस स्टेशन,यवतमाळ शहर

मार्फत :- ठाणेदार पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर.

२/- उपरोक्त आदेशाची दोन (२) प्रति पाठविण्यात येत असुन मूळ प्रत सबंधितांस अदा करुन दुय्यम प्रतिवर दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक -१/डीपीजी लिपीक/ कर्मचारी आस्थापना लिपीक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

## बिनतारी संदेश

**प्रति** - उपविपोअ. उमरखेड /**ठाणेदार** - पोस्टे. महागाव

**पासुन** - **पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**हस्ते** - अपोअधी. यवतमाळ/पोउपअधी. मुख्या./वाचक (पोअधी. यवतमाळ)/रा.पो.नि., **पो. मु.**
**/रोखपाल पो.मु./ प्रवासभत्ता लिपिक/** डिपीजी.

---

**क्रमांक-पोअय/आशा/प्रशि/ VIP SEC./** 11427 **/२०१९ यवतमाळ** दि.- 4 OCT 2019

---

विधानसभा निवडणुक – २०१९ दरम्यान अतिमहत्वाच्या व्यक्तिंच्या बंदोबस्तकरीता तयार करण्यात आलेल्या विशेष पथकांतर्गत या घटकातील खालील नमुद पो. कर्म. यांची निवड करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नाव | नेमणुक |
|---|---|---|
| ०१ | पोशि/११९, संतोष मेरचंद जाधव | पोस्टे. महागाव/संलग्न उपविपोअ. उमरखेड |

सदर बंदोबस्तकरीता निवड झालेले पो. कर्म. न पाठविल्यास सदर पो.कर्म. व प्रभारी अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रभारी अधिकारी, यांनी निवड झालेले वरील पोलीस कर्मचारी हे दि. ०६/१०/२०१९ रोजी सकाळी ०८:०० वाजता पर्यत महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे पोहोचतील या बेताने त्यांना तात्काळ मोकळीक करावे. सदर बंदोबस्तकरीता वरिल नमुद पो. कर्म. यांनी सोबत बंदोबस्तासाठी स्वत:ची व्यक्तिगत साधनसामुग्री, ओळखपत्र, मोकळीक मेमो तसेच आवश्यक दैनिक प्रवासभत्ता घेवुन जाण्याबाबत प्रभारी अधिकारी, यांनी त्यांना समज दयावी.

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( अनिलसिंह गौतम )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

# समाप्त